UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Special Issue : Volume -10 : Issue-1 (January-2024)
ISSN 2455-4375

# भविष्यातील ग्रंथालय संसाधने

संशोधक विदयार्थी
**शरद यु. सोनवणे**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर
मो. क्रमांक : **9766254748**

**डॉ. एस.एच. उरकुडकर**
आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायंन्स कॉलेज, पुलगांव जि. वर्धा.

---

**प्रस्तावना :**

ग्रंथालयशास्राच्या ४ नियमानुसार वाचकांचा वेळ वाचला पाहिजे ह्यास अनुसरून भविष्यातील संसाधनाद्वारे जलद सुविधा मिळतांना दिसत आहेत दिसणार आहेत.

तसेच श्री एस आर रंगनाथन यांच्या पाचव्या सुत्रानुसार ग्रंथालय ही वाढ होणारी व सतत विकसित होणारी संस्था आहे. व त्या बदलत्या काळातील बदलत्या तंत्रज्ञाना सोबत ग्रंथालयांनी व ग्रंथपालांनी जुळवून घेत माहीती अधिकारी म्हणून ठसा उमटवत राहिले पाहिजे.

भविष्यातील नवनवीन ग्रंथालय संसाधने आत्मसात केली पाहिजेत उद्याचे जग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. व कृत्रिम बुद्धिमत्तेचा काही प्रमाणात वापर सुरु झाला आहे. याचे एक उदाहरण म्हणजे वाहनात याचा वापर आपण बघू शकतो स्वयंचलनावर एखादे वाहन संचलित केले की ते वाहन कृत्रिम बुद्धीमता वापरून चालत राहते. ज्यात ओहरटेक करणे स्थिती परिस्थिती नुसार वेग कमी जास्त करणे हे कृत्रिम बुद्धिमत्तेचा चा वापर करुत राहते. याच प्रमाणे ग्रंथालयात देखील कृत्रिम बुद्धीमत्ता वापरात आलेली असेल त्या तंत्रज्ञानाशी ग्रंथपालांना सामोरे जावेच लागणार आहे.

**महत्त्वाचे मुद्दे**

- ITक्षेत्रा मधील तंत्रज्ञ व ग्रंथालय व्यावसायिक यांची भविष्यातील तिव्र स्पर्धा ,
- कृत्रिम बुद्धीमत्ता व यंत्र मानव अशा संसाधनाचा ग्रंथालयातील वापर.

* **भ्रमणध्वनी (mobile ) संसाधन आधारीत ग्रंथालय सेवा**

* क्लाऊड का ॅम्प्युटींग
* R.F.I.D : आर. एफ. आय. डी.
* क्युआर कोड

**ग्रंथालय साधनांची व्याख्या :**

लायब्ररी टूल्स म्हणजे सेवेमध्ये उपलब्ध केलेली कोणतीही साधने होय.
ग्रंथालय साधने ही भौतिक आणि डिजिटल अशी संसाधने आहेत जी तुम्हाला माहिती शोधण्यात, प्रवेश करण्यात आणि व्यवस्थापित करण्यात मदत करू शकतात.
**कॅटलॉग:** हे ऑनलाइन डेटाबेस आहेत जे तुम्हाला पुस्तके, जर्नल्स आणि ग्रंथालया मध्ये असलेली इतर सामग्री

शोधण्याची परवानगी देतात.

अशाच प्रकारच्या संसाधनांचा आपण या संशोधन पत्रात विचार करणार आहोत.

**विषय निवडीचा उद्देश :**

१) बदलत्या तंत्रज्ञान युगात ग्रंथालय व्यावसायिकांना कसे टिकून राहता येईल हे सांगण्याचा प्रयत्न करणे.

२) (I.T,) माहीती तंत्रज्ञानाचे कौशल्य भविष्यातील ग्रंथालये व ग्रंथालय व्यावसायिकांनी आत्मसात केले पाहिजे .

३) सध्याच्या प्रचलित (social media) समाज माध्यमांचा ग्रंथालया सोबत कसा ताळमेळ घालून वाचकांना प्रभावी सेवा देता येतील हे सांगणे.

उदयोन्मुख तंत्रज्ञान साधनांचा ग्रंथालय सेवांवर होणारा परिणाम थोडक्यात सांगणे.

**कृत्रिम बुद्धीमत्ता व यंत्र मानव अशा संसाधनाचा ग्रंथालयातील वापर :**

यात यंत्र मानवात कृत्रिम बुद्धिमत्तेचे मृदुसाधन टाकून ग्रंथालयातील अनेक कामांमधे वापर केल्या जाईल जसे की

**ग्रंथ सोपस्कार :**

ज्यात यंत्रमानवाकडून बारकोडींग चिठ्या लावून घेणे, शिक्के मारणे, ग्रंथालयाच्या कपाटात पुस्तके लावणे ग्रंथपालांनी दिलेल्या अज्ञावली नुसार कपाटावरुन पुस्तके वाचकापर्यंत देवघेव करणे अशी कामे यंत्रमानवाकडून दिसू लागतील .

**भ्रमणध्वनी (mobile ) संसाधन आधारीत ग्रंथालय सेवा :**

ज्यात ग्रंथालयांची तीन मुख्य उद्दिष्टे म्हणजे साक्षरतेला प्रोत्साहन देणे , लोकांपर्यंत उपयुक्त दैनंदिन माहितीचा प्रसार करणे. वाचन साहित्य आणि संसाधनाद्वारे अजिवन शिक्षणास प्रोत्साहन देणे .भ्रमणध्वनी ग्रंथालय अशा वापरकर्त्यांसाठी ग्रंथालयाच्या निश्चित स्थानाबाहेरील संसाधने उपलब्ध करतात.

एस.एम.एस. आणि व्हाट्सअ‍ॅप सारख्या भ्रमणध्वनी सेवा संसाधनाच्या मदतीने ग्रंथालये नविन सेवा तयार करु शकतातआणि त्यांच्या संग्रहात जलद प्रवेश देऊ शकतात. यात (LMS) Learning management system चा समावेश होतो.

भ्रमणध्वनी आधारित ग्रंथालय सेवेत सभासदांना एखादी विशिष्ट माहिती व्हाट्सअ‍ॅप द्वारे जलदरित्या पाठवणे शक्य आहे. ज्यात

पी.डी.एफ. फाईल करुन देखील माहिती पाठवणे सहज शक्य आहे. तसेच ग्रंथालय सभासद व्हाट्सअ‍ॅप ग्रुप द्वारे ग्रंथालयाशी अनेक लोक एकाच वेळी माहितीची देवाणघेवाण करु शकतात.

ग्रंथालयाकडे आवश्यक असलेल्या ग्रंथाची मागणी नोंदवणे सहज शक्य आहे.

त्याच प्रमाणे अनेक ग्रथालयांचा व्हाट्सअॅप ग्रुप तयार करुन अर्तग्रथांलयीन देवाणघेवाण करणे शक्य आहे. हेच काम व्टीटर , फेसबुक , सारखे सामाजिक साधने वापरुन देखील करता येईल.

**३) क्लाऊड काॅम्प्युटींग :** या द्वारे आपण संगणकावर करत असलेले काम आभासी पध्दतीने साठवून ठेवणारी एक मोठी व्यवस्था आहे.

ग्रंथालय सेवा सुव्यवस्थीत आणि वाजवी बनवण्यासाठी जगभरातील ग्रंथालये क्लाऊड काॅम्प्युटींगचा अवलंब करत आहेत.

ही ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली ही डीजिटल ग्रंथालये किंवा साठे तयार करण्यात महत्त्वाची भुमिका बजावत आहे. क्लाऊड काॅम्प्युटींग ग्रंथालय संसाधने मानवी संसाधने पायाभूत सुविधा इत्यादींचा इष्टतम वापर सुनिश्चित करते.

यात डेटा बॅकअप तयार करणे , तसेच तृतीय पक्ष सेवा सर्व्हर व्यवस्थापित करु शकतात , त्यात श्रेणी सुधार करु शकतात.

**R.F.I.D :** आर. एफ. आय. डी. हे तंत्रज्ञान संसाधन स्मार्ट आयडेंटीटी कार्ड प्रमाणे काम करते त्यास पुस्तकाचे

ओळखपत्र म्हटले तरी चालेल.

**आर एफ आय डी चा ग्रंथालयातील उद्देश :**

अ) ग्रंथालयीन व्यवस्थापणाला सुरक्षितता प्राप्त करण्यासाठी .
ब) ग्रंथ गहाळ होण्याच्या समस्येवर नियंत्रण व ग्रंथाचे संरक्षण करण्यासाठी .
क) वाचकांचा वेळ वाचण्यासाठी.
ड) ग्रंथालयीन कार्य जलद होण्यासाठी.

**आर एफ आय डी ची ग्रंथालयातील आवश्यकता :**

१) ग्रंथालयात होणारी वाढ याठी
२) ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धतीचा अवलंबा मुळे RFIDची आवश्यक आहे.

**IT क्षेत्रा मधील तंत्रज्ञ व ग्रंथालय व्यावसायिक यांची भविष्यातील तिव्र स्पर्धा :**

भविष्यकाळात आपण ग्रंथालय व्यावसायिकांनी जर डीजीटल माहिति तंत्रज्ञान आत्मसात केले तरच ग्रंथालय व्यावसायिक हे माहिति अधिकारी म्हणून आपला दबदबा कायम ठेऊ शकतील अन्यथा ग्रंथालय व्यावसायिकांची जागा आय. टी. क्षेत्रातील तंत्रज्ञ घेण्यास वेळ लागणार नाही .

त्यामुळे ग्रंथालय माहितीशास्र विषयाचा विस्तार करुन माहीती तंत्रज्ञान हा विषय ग्रंथालयशास्त्रातील अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्यास ग्रंथालय व्यावसायिक व ग्रंथालययांचे अस्तित्व टिकून राहिल.

**QR कोड :** वाचकांसाठी पुस्तकांचा शोध सुलभ करते, QR कोड अमर्यादित माहिति लिंक करू शकतात. त्यामुळे, तुम्ही तुमच्या ग्रंथालय तालिकापत्राशी QR कोडशी जोडू शकता. हे तंत्रज्ञान साधन आपण तयार करणे

आवश्यक आहे, ग्रंथालय प्रवेश द्वारासारख्या सोयीच्या ठिकाणी. स्कॅन केल्यावर, वाचक थेट कॅटलॉगवर जातील आणि त्यांचे पुस्तक शोधतील.

**सारांश :**

भगवत गितेच्या नवव्या अध्यायातील दहाव्या श्लोकात भगवान श्री कृष्ण हे अर्जुनाला उपदेश करतांना सांगतात की विश्वात सतत परिवर्तन होत असतात, ह्या परिवर्तनाशी जुळवून घेता आले पाहीजे.

ग्रंथालयांचे ही तसेच आहे एका पेटीत बंदीस्त ग्रंथालय स्थिती पासून ते मुक्तद्वार ग्रंथालय स्थित्यंतरे झाली व पुढे ग्रंथालय संगणकीकरणाचा प्रवास देखील अनुभवला ही सातत्याने घडतच राहणार आहे. यापूढे भविष्यातील होणाऱ्या बदलास आपल्याला जुळवून घेता आले पाहिजे, ते बदल स्विकारता आले पाहीजे उद्या चे जग हे कृत्रिम बुद्धीमत्तेचे आहे याचा काही प्रमाणात वापर सुरु झाला आहे.

याचे एक उदःहरण म्हणजे वाहनात याचा वापर आपण बघू शकतो. स्वयंचलनावर एखादे वाहन संचलित केले की ते वाहन कृत्रिम बुद्धिमत्ता वापरुन चालत राहील. तसेच ग्रंथालयात देखील कृत्रिम बुद्धीमता वापरात आलेली असेल . त्याच्याशी ही ग्रंथपालांना सामोरे जावे लागणारच आहे.

**संदर्भ :**

- Ahire, Subhash B. (2014). “Application of Mobile Technology in Libraries.” In Role of Librarians in Modern Era, 75.
- Bhosale, Sapana S., and S.A.N. Inamdar. (2015). “Impact Networking on Library Services.” In Emerging Trends in Library 159.
- Dr. Gopale vijaykumar B. , Q.R. Code and useful application in libraries .
- International Journal of library and information studies , VOl. 9(4) October to december 2019.
- फडके द.ना. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण , युनिव्हर्सल प्रकाशन पुणे, २००७ ,पृष्ठ क्रं ३५१
- पाटील एस.के. डिजीटल ग्रंथालये :आधुनिक काळाची गरज , ज्ञान गंगोत्री , अंक -३डिसेंबर ते फेब्रुवारी २००४ , पृष्ठ क्रं. ५२